ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 7 | MARCH - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ऐतिहासिक लातूर जिल्हा



डॉ. लदाफ एस.के.
इतिहास विभाग , आझाद महाविद्यालय ,
औसा जि. लातूर .

**सारांश :-**

लातूर जिल्ह्याचा इतिहास पाहताना लातूर शहराची उत्पत्ती त्याचा सिध्दांत लातूर वर असलेल्या राष्ट्रकुट वाकाटक, यादव राजांचा संबंध असल्याचे दिसुन येते लातूर जिल्हा व परिसरात आनेक प्राचीन व मध्ययुगीन मंदिरे अस्तित्वात आहेत. व त्याच बरोबर विविध संप्रदायाची मठे दर्गे खानखाँ मस्जिदे आढळतात व त्याच बरोबर वास्तुशिल्पाचा विचार केल्यास लातूर जिल्ह्यातील उदगीरचा भुईकोट किल्ला व औश्याचा भुईकोट किल्ला, निलंगा येथील निलकंठेश्वर मंदिर औसा उदगीर येथील जैन मंदीर लातूर येथील सिध्देश्वर मंदिर व संपूर्ण लातूर जिल्हयात सुफी पंथ व त्यांची दर्गे अशा कितीतरी अनेक वास्तु शिल्पामुळे लातूर जिल्ह्याचा ऐतिहासीक महत्त्व साक्ष देत उभे आहे. असे म्हणता येईल कि लातूर जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणुन सुध्दा महाराष्ट्र शासनाने घोषित करावे असे मला वाटते.

## प्रस्तावना :

आज लातूर हे महाराष्ट्रातील एकमेव ग्रामनाम असणारे शहर असुन हे नाव इ.सनाच्या पाचव्या शतकापासुन पडलेले आहे. याची माहिती शिलालेख तामृपट व कांही ग्रंथात सापडते लातूर हा शब्द पूर्वी लत्तलुर, लातनुर आणि आत्ता लातूर अशा पध्दतीने वापरला जात आहे. तसेच लातूरच्या रत्नापुर महात्मय या ग्रंथात लातूरच्या व रत्नापुर व लातूर असा ही नामउल्लेख याचबरोबर महाराष्ट्रात सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य व यादव या घराण्याचा ज्या बलाढ्य सत्ता झल्या त्या सत्तापैकी वाकाटक ही सत्ता सोडता बाकी सर्वांचे अधिपत्य लातूर व लातूर परिसराव होते अशी माहिती उपलब्ध होते.

याचे प्राचिन संदर्भ कन्नड, संस्कृत व मराठी शिलालेखामधून प्राप्त होतात. हे शिलालेख कासारशिरसी गणेशवाडी (ता. निलंगा) सुगाव शिरुर ताजबंद ता. अहेमदपूर इ. ठिकाणी प्राप्त झाले आहे. लातूरचे प्राचिन नाव लट्टालूर असे नोंदविले आहे. तेरदळ लेखात लतलूर तर केव्हाळे येथील लेख भोज येथील तामृपटात व सौदंतिच्या आनखी एका लेखात लतलुर असाच शब्द योजलेला आहे. या लेखाचा काळ शके 1008 शुक्रवार वैशाख शृ. 13 प्रमाणात संत्सर इ.स. 8 एप्रिल 1086 असा आहे. हा लेख विक्रमादित्य यांच्या राजवटीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश विक्रम आदित्याचा महाराष्ट्र कुळ वंशिय मांडलीक महासामंत धाडीमंडक याचा लत्तालोर निवासी दंडनायक वत्सवगोत्री पदनाम भट्टाचा पत्र वासुदेव यांनी दिलेल्या दानाची नोंद करणे हा आहे. उपरोक्त कानेगांव शिलालेखाच्या काळ शके 1180 काळयुक्त नाव संवत्सर मार्गशीर्ष 10 गुरुवार सन. 7 डिसेंबर 1258 असा आहे. यात लतलोर असे ग्राम नाम उल्लेख आहे. यात कान्हर देवाचा मांडलिक राठोड वंशीय सामवंशीय कुळातील गोपाळ देवाने स्वकियांच्या कल्यानार्थ केलेले एक लक्ष होमाच्या उल्लेख असु न त्या होमाची पुर्तता व्हावी म्हणुन कांही गावे दान दिल्याची नोंद आहेत.[1]

लातूरचे पौराणीक नाव रत्नापूर किंवा रत्नपूर असे असावे व त्याचेच पुढे लतनुरपूर असे झाले असावे. लातूर हे बदामीच्या चालुक्य काळात अस्तित्वात असल्याचे विक्रामादित्याच्या इ.स. 682 मधील कर्नुल (आंध्रप्रदेश) ताम्रपटातील या

स्थळनामाच्या उल्लेख वरुन सिध्द होते. या ताम्रपटामुळे अनेक स्थळांची नव्याने ओळख होऊ शकेल. या लेखात रट्टागिरी व रटलगिरी असे स्थळ नाम आहे.[2]

लातूरचे मुळ रुप रट्टनुर किंवा रट्टरुर असावे या शब्दाच्या अपभ्रंशानंतर लत्तनुर ,लत्तलुर अशी साधे रुपे तयार झाली असावीत लतलूर पासुनच लातूर हे तयार झाले असावेत [3].

राष्ट्रकुट राजे स्वतःहास लत्तलुर पुराधिश लत्तलूरपुर परमेश्वर, लत्तलूर परमेश्वर, लत्तलूरपुरवराधिश्वर अशी बिरुदे लावली राष्ट्रकुट अमवर्ष पहिला याचा नामउल्लेख ही याच विरुंदांनी लतलूर सम्राट या आर्थि केला गेला. तो स्वतला लत्तलुरीया सम्राट असल्याचा अभिमान बाळगत असे राजगादी गेल्यावर ही अमोघ वर्ष कांही वर्ष लातूर मध्ये राहीला असावा. व त्यामुळे त्याला प्रथम हे बिरुध्द लावले गेले आसावे. [4]

राष्ट्रकुटाच्या अनेक तामृपटावरुन लतलुर पुराधिश्वर असा शब्द प्रयोग योजलेला दिसतो. राष्ट्रकुट कालीन कला तैमनशी साक्ष देणारे अनेक शिल्प भगण अवशेष सिद्देश्वर मंदिराच्या परिसरात विखुरलेल्या आवस्थेत सापडतात.[5]

या नंतरच्या काळात या तंत्रातील विविध व्यक्तींनी बाहेर जाऊन कर्नाटकातील बेळगावातील सुगंधावती उर्फ सौदन्ती तसेच महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाडा विभागातील छोट्या छोट्या राज्यात सामंत किंवा प्रशासन अधिका-यांची पदे प्राप्त केली पण लत्तालुर शी संबंध जोडला नाही. धार्मीक स्थळ बाबत आज लातूरात रामगल्लीतील राम मंदिर, गौरीशंकर मंदिर रामलिंगेशवर मंदिर केशवराज मंदिर, रतमेशवर मंदिर सिद्देश्वर मंदिर अष्टविनायक मंदीर, भुतनेश्वर मंदिर, चिंतामणी मंदिर, सुरतशाह वलि दर्गा .[6]

## ऐतिहासिक किल्ला औसा

**एक एतेहासिक शहर औसा :** लातूर जिल्ह्यातील औसा शहराला ऐतिहासिक सामाजिक संस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. औसा या शहराचे हिजिरी 1014 मध्ये मलिकंबर काळामध्ये अम्रापूर असे नाव होते. हे शहर साधारण पणे साडेतिनशे वर्षावूर्वी वसलेले आहे. औसा नगरीचे प्राचिन नाव बदामीचा चालुक्य राजा विजयदित्त्य याच्या बोरगाव ताम्रपटात उच्छीव हा शब्द संस्कृत शब्द असुन त्याचा श्रेष्ठ अथवा प्रमुख असा अर्थ होतो. जिनसेन या आठव्या शतकातील जैन लेखकाने औच्छ असा उल्लेख केला आहे. प्रसिध्द कवी जैन मुखी कनकाबर हा औशाचा रहिवाशी होता त्याने करकंड चरयु हा काय गंथ लिहीला या ग्रंथात त्याने औसा या नगराचा असई असा उल्लेख केला आहे. प्राचिन काळापासून उच्छीव, औच्छ असई यावुन औसा अशी नावे रुढ झाली असावी यादव कालिन खोलेश्वर दरवाजा अंबाजोगाई (शके. 1150) यात उदगीर बरोबर औशाचीही नोंद आहे. यादव काळात औसा हे शहर प्रशासकीय विभागाचे केंद्र म्हणून प्रसिध्द केंद्र आहे.[7]

**भूईकोट किल्ला औसा :** औसा येथे भूईकोट किल्ला असून त्याचे क्षेत्रफळ 24 एकर 30 गुंठे आहे त्याच्या भोवती खंदक असुन ते सध्याही चांगल्या स्थितीत आहे खंदकात अनेक विहरी आहेत खंदकाला लागून किल्यात पहिल्या तटास अहशमा नावाचा दरवाजा आहे. त्यानंतर किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर एक मेव दरवाजा आहे. लोहबंद अहशम हे दरवाजे पूर्वभिमूख आहेत किल्यात एकुण दोन तट आहेत. खंदकाचे भिंतीपासून पहिल्या तटाच्या भिंतीपर्यंत साधारण पणे 180 ते 200 फुट अंतर आहे. दुस-या तटाच्या आत इशरत महल, लाल महल, पाणी महल, इत्यादी इनेक इमारती आहेत.[8]

**किल्ल्याचा राजकीय इतिहास :** औश्याच्या किल्ल्याला राजकिय ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले होते या शहराला यादव पुर्व काळापासुन महत्त्व प्राप्त झाले होते. इ.स. 1375 मध्ये बहामणी सुलताना येथे आपली सत्ता स्थापन केली. किल्ला बांधुन पुर्ण झाल्यानंतर त्यावर विजापुरच्या अदिलशाहचा ताबा होता शहाबोद्दीन मोहम्मद बहमणी सुलतानाने हा किल्ला अमीर कासीम बरीद याला जहागीर म्हणुन दिला होता त्याने स्वतःला स्वतंत्र घोषीत करुन बरीदशाहीची स्थापना केली. या किल्यावर पुढे 1540 मध्ये पहिला बु-हाण निजामशाह याने ताबा मिळविला होता. निजामशा विरुध्द अदिलशाही आणि मोधल यांच्यात इ.स. 1635 मध्ये तह झाला होता. त्या तहाच्या फर्मानात औशाची नोंद आहे. मोगल बादशहा शहाजहान यांच्या खास आदेशावरुन जिंकुन घेतला होता. व मोगल सेनापती जुलमीखारखॉन यांच्यात या भागात अनेक चकमकी झाल्या हैद्रबादच्या निजामी संस्थानाकडुन 1853 इंग्रजांनी हा भाग गहान म्हणुन घेतला होता. त्याचा ताबा या भागावर 1861 पर्यंत होता त्यावेळी कर्नल मेटोज टेलर हा ब्रिटीश कमिशनर म्हणुन नळदुर्ग परगण्याचा प्रमुख होता. त्याच्या ताब्यात औसा किल्ला होता. त्याच्या निवासाची वास्तु किल्ला जवळ आहे. त्याने सारबाग, अंगुरबाग, जामबाग, इत्यादी महत्त्वाच्या बागा लावल्या होत्या त्या आज ही या शहरात प्रसिध्द आहेत. इ.स. 1861 पासुन पुढे हा भाग प्राप्ती पर्यंत हैद्राबादच्या निजाम राजवटीकडेच राहीला [9].

**धार्मिक महत्त्व :-** औसा येथील प्राचीन काळापासुन येथे जैन महामुनी व महानुभव पंथाचे तत्त्वज्ञान पीठ होते. या शिवाय नाथ संप्रदायी, भागवत संप्रदायाची लिंगायत संप्रदायाची, सुफी संप्रदायाची पिठे आहेत प्राचीन जैनमंदिर, श्रीरामाची मंदीर,

भोतताली चारी दिशेने एकुण सात हणुमान मंदीर दिगंबर जैन मंदिर, विरनाथ मल्लीनाथ मंदीर, हजर खाकी शफा, हजरत सय्यद सादात, हजरत सय्यद ताले बु-हाण, हजरत नक्शबंदी , हजरत ताजोद्दीन,

निलंगा, निलकंटेश्वर मंदीर, हजरत निजामोद्दीन औलिया, हजरत पीरपाशा कादीर, हजरत सय्यद शाह हैदर अलि, सय्यद शमशोद्दीन सरोवर, तळी खेळ मंदीर [10]

**ऐतिहासीक शहर उदगीर :-** उदगीर हे एक प्राचीन वस्तीचे शहर आहे. एके काळी येथे मोठे शहर असावे मात्र आता ही वस्ती बीदर जिल्ह्यातील एक तहसिल आहे आज हे लातूर जिल्ह्याचा तालुका आहे. येथील भौतिक खुणावरुन व वस्तीच्या खुनावरुन ही वस्ती आठशे वर्षापुर्वीची असावी ज्या मैदानावर दगडी किल्ला आहे. पुर्वी एका ब्राह्मनाची कुटी असावी हळुहळु वस्ती वाढत केली आणि या जागेचे नाव उदागीर महाराज यांचे नावावरुन या वस्तीचे नाव उदगीर असे पडले. किल्ल्याच्या आत आज ही उदागीर बाबाचे मंदीर आहे. हे एक पवित्र स्थळ आहे. करबस्तीकुंद या ग्रंथात एक कथा लिहली आहे या कथेवरुन या वस्तीचे नाव उदगीर असे पडले आहे.[11]

उदगीर किल्ल्याचे बांधकाम बहमणी काळात झाले असावेत मात्र हा किल्ला कोणी बांधला हे निश्चित सांगता येत नाही. तारीख ए फेरिस्ताच्या मुळ ग्रंथा आधारे सिध्द होते की, महंमदशहा बहामणी याने आपल्या शेवटच्या कारकिरदीत कासीम बरीदला बिदर व उदगीर, हे जहागीर म्हणुन महमदशहा बहामणीने हिजरी 898 मध्ये दिले यावरुन हे सिध्द होते कि, हा किल्ला बादशहाबरीद याने बांधला असावा. व बहमणी राजवटीत या किल्लयात नवीन बांधकाम झाल्याचे आढळते. कासीम बरीद याने हिजरी 909 मध्ये बिदरचा सर्वेसव मुख्य बादशहा झाल्यानंतर त्याने आपला मुलगा अमीर बरीद यांच्याकडे उदगिरचा किल्ला सोपविला. हिजरी 923 मध्ये अमीर खुहानंदखॉन हब्बशी हा माहूरचा जाहगीरदार होता या सोबत या किल्लयावर धनघोर युध्द झाले. या युध्दात हबशी मारला गेला व किल्ल्यावर अमीर व बरीदची हिजरी 937 मध्ये बिदर मुकामी अमीर व अदिलशहा बिजापूर यांच्यात लढाई झाली यात बादशहा अमीर बरीत हा कैदी झाला मात्र अदिलशहा ने बरीदला जीवनदान दिले व त्यास सोडून दिले. तेव्हा पासून अमीर बरीद उदगीरच्या किल्ल्यातूर आपल राज्यकारभार पाहू लागला. गव्हर्नर इमाद उल्मुल्कने बरीदची शिफारस अदिलशहाकडे केली. अदिलशहाने बिदरचा किल्ला अमीर बरीदला दिला नाही. अमीर बरिदच्या नंतर अली बरीद बरीदशाहीचा तिसरा बादशहा उदगीरच्या किल्ल्यावरुन राज्यकारभार पाहु लागला. [12]

**उदगीरच्या किल्ल्याची स्थिती :-**

हा किल्ला आज ही चांगल्या अवस्थेत आहे. आणि वस्तीच्या दक्षिणेला खोल भागात किल्ला आहे. किल्ल्याच्या सभोवताली चाळीसफुट खोल व विस फुट रुंदीचा खंदक आहे. तटबंदी 30 फुट आहे. यावर चार प्रसिध्द बुरुज आहेत. 1. जमनाबुरुज या बरुजावर दोन तोफा चढवलेल्या आहेत. एका तोफावर कांही कोरलेले आहे. मात्र वाचता येत नाही. 2. नाग बुरुज, 3. बुरुज 4. कत्तेबुरुज आहेत. किल्ल्यात प्रवेश करताना एक मोठी कमा आहे. यातुन प्रवेश करुन पुढे गेल्यास 50 फुटावर किल्ल्यातचे पहिले प्रवेश द्वार आहे. मोठी कमान व प्रवेश द्वाराच्या दरम्यान एक खंदक असुन त्याव पुल बांधलेला आहे. कमानिच्या शेजारी एक अशुरखाना, कमानीच्या बाजुला एक नगीना बगीचा आहे. मात्र हा कोणी बांधला सिध्द होत नाही. किल्ल्याच्या बाहेरील भिंतीवर मोठ मोठ्या दगडावर हत्ती व इतर प्राण्यांची मुर्ती खोदल्या आहे. आणि दुसरे प्रवेश द्वार सारखे सुंदर आहे. तिसरे प्रवेश द्वार या दोन्ही प्रवेश द्वारापेक्षा उंच व मजबुत आहेत याला अंधेरा दरवाजा म्हणुन ओळखले जाते.[13]

**उदगीरचा ऐतिहासक चौबारा :-** उदगीर किल्ल्याच्या रस्त्याला चौबारा नावाची इमारत आहे. हे दोन मजली इमारत असुन 33.3 मीटर तिचा परिघ 8.3 मिटर आहे. या चौबा-याहुन चारी ही दिशेला रस्ते जातात उत्तरेकडे किल्ला दरवाजा आहे दक्षिणेचा रस्ता देवणी वेस कडे जातो ही देवणी वेस पाडण्यात आली आहे. पूर्वकडे निडेबनवेस, पश्चिमेकडे कंधार वेस, तर दुसरी वेस तळवेस कडे जाते ही सुध्दा वेस पाडण्यात आली आहे.[14]

**उदगीर येथील दर्गे , मंदिरे व मस्जिद :-** उदगीर शहरात शंकर अप्पा महाराजांचा मठ, श्री. हावगी स्वामी महाराजांचा मठ, बालाजी मंदीर, सोमनाथपूरची मंदीर, जैन मंदिर, बोधन आई ची मंदिर, हजरत सय्यद शाहमहंमद कादरी दर्गा , हजरत पीरपाशा कादरी, हजरत शाह हुसेन, अफजल टिकटीकी, हजरत सय्यशाह सैलानी, हजरत खाजा सदरोद्दीन, हजरत शादाऊल बाशा, हजरत सय्यद चाँदशाह हुसेन कादरी, जामा मस्जिद इत्यादी.[15]

संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| 1. मराठवाड्याचा इतिहास | - | पी.व्ही. काटे |
| कैलाश पब्लिकेशन | - | पृष्ठ क्र. 79, 87 |
| 2. लातूरचा ग्रामशोध | - | जोशी सत्र निवडक शोध निबंध खंड 5 वा भ.ईपी. पृष्ठ क्र. 147 , 149 |
| 3. लातूर हेच राष्ट्रकुलाचे मुळ स्थान | - | गो.वी. देशमुख निवडक शोध निबंधक खंड 4 था 199,132 |
| 4. देविदास चव्हाण | - | गौरव गंथ, पृष्ठ क्र. 158 |
| 5. ठोसर हरिहर | - | पृष्ठक्र. 224 , 225 |
| 6. दैनिक लोकमत | - | झेप , 9 जानेवारी 2007 |
| 7. बशिर अहेमद देहली | - | वाकियाते ममलेकात ए. बिजापूर खंड तिसरा प्रकाशन कर्नाटक उर्दु अकॅडमी फेब्रुवारी 2004 पृष्ट क्र. 42 |
| 8. कित्ता | - | 49 |
| 9. कित्ता | - | 49 |
| 10. थावरा राजाराम राठोड | - | उदगीरचा इतिहास व स्मारके पृष्ठ क्र. 58-59 |
| 11. प्रत्येक्ष सर्वेक्षण | - | 2018 |
| 12. उदगीरचा इतिहास | - | सुधाकर देशमुख प्रकाशक जनशक्ती वाचक चळवळ प्रथम आवृत्ती – 2010 प्रष्ठ क्र. 183 |
| 13. थावरा राजाराम राठोड | - | उदगीरचा इतिहास व स्मारके पृष्ठ क्र. 58-59 |
| 14. प्रत्यक्ष सर्वेक्षण | - | 2019 |
| 15. प्रत्यक्ष सर्वेक्षण | - | 2019 |